# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ३८/२०१४-१५/ दिनांक :

**<u>आदेश केस क्र.३८/१४-१५</u>**

| | |
|---|---|
| श्रीमती शालिनी उर्फ शालन काशिनाथ रेडेकर,<br>मुक्त सैनिक सोसायटी,<br>विरोबा मंदिराजवळ,इचलकरंजी,<br>जि.कोल्हापूर. | अर्जदार |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर. | |
| २) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इचलकरंजी. | विरुध्द पक्षकार |
| ३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभागीय कार्यालय, अ, इचलकरंजी. | |

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री.बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्रीमती शालिनी उर्फ शालन काशिनाथ रेडेकर,यांनी दि.११.०६.२०१४ रोजी वितरण कंपनी, विभागीय कार्यालय,इचलकरंजी, यांचेविरुध्द आपला मुलगा खंडेश्वर काशीनाथ रेडेकर, यांचेमार्फत तक्रार दाखल केली. तक्रारदार यांनी दि.३१.१२.२०१३ रोजी वीजजोडणीसाठी अर्ज केला आहे. अंतर्गत कक्ष, कोल्हापूर, येथे तक्रार दाखल केली. त्या आदेशाच्या नाराजीने प्रस्तुत अपील दाखल केले. तक्रारदार यांचे पती कै.काशिनाथ रेडेकर वीजजोडणी मागितलेल्या जागेत वहिवाटदार (Occupant) होते. घरफाळ्याची पावती जोडली आहे. त्यासोबत १९८४ मधील चौकशी उतारा जोडला आहे. त्यामध्ये अर्जदाराचे पती कै.काशीनाथ रेडेकर यांचे नांव आहे. वितरण कंपनीने quotation मुदतीत दिले नाही. त्याबाबत भरपाई मिळावी. वीजजोडणी मिळावी व विलंबाची भरपाई मिळण्याचे आदेश व्हावेत.

वितरण कंपनीला नोटीस देऊन दि.२७.६.२०१४ पूर्वी अहवाल देण्यास कळविले होते. मुदतीत अहवाल दिला नाही. प्रस्तुत सुनावणी दि.१६.०७.२०१४ रोजी घेतली. ग्राहकाचा मुलगा व वितरण कंपनीचे श्री.राठी,उपकार्य.अभियंता उपस्थित होते. त्यांनी आपले म्हणणे दाखल केले.

जागेचे मुळ मालक यांचे वारस श्री.वसंत राघू बंडगर यांनी वीज कनेक्शन देऊ नये असा अर्ज दिल्यामुळे कंपनीचे विधी अधिकारी यांचे अभिमत मागविण्यात आले. ते लेखी अहवालासोबत जोडले आहे. त्यांनी वीजजोडणी तक्रारदार यांना देऊ नये असे मत व्यक्त केले आहे. तक्रारदाराच्या मुलाने इचलकरंजी नगरपरिषद यांची property extract हजर करण्याचे मान्य केले ज्यामुळे ७/१२ च्या नोंदीला महत्व देण्याची गरज नाही असे सांगितले. तक्रारीसोबत सन २०१३-१४ वर्षाची कराची पावती व नगरपालिकेचा सन २०१२-१३ सालाचा उतारा हजर केला. त्यात भोगवटा करणारा या रकान्यात तक्रारदार यांचे नांव आहे. याउलट वितरण कंपनीचे अधिकारी श्री.राठी आपल्या Legal Adviser यांचे दि.२.६.२०१४ च्या अभिमतावर (Opinion) विसंबून राहिले आहेत.

खालील मुद्दा न्यायनिर्णयासाठी मंचाकडे उपस्थित होतो.

**मुद्दा क्र.१:** तक्रारदाराने मागणी केल्याप्रमाणे त्यांना वीजजोडणी देणेचे आदेश वितरण कंपनीस देणे योग्य होईले का ?

**उत्तर :** होय.

## कारणमिमांसा

उभय बाजुच्या कथनानुसार तक्रारदार यांनी वितरण कंपनीकडे दि.३१.१२.२०१३ रोजी घरगुती वापरासाठी वीजजोडणी मिळावी म्हणून अर्ज केला. जागेचे मालक यांच्या वारसाने हरकत घेतली. परंतु त्याची प्रत हजर केली नाही. तसेच तक्रारदाराने अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्सची पाहणी केली असता तक्रारदार यांने नगरपालिकेकडे कर भरल्याचे दिसत आहे. सन २०१३-१४ या एक वर्षाचे भरलेचे दिसत आहे. मालकी हक्काने कै.राहू धोंडू बंडगर हे

मालक आहेत परंतु भोगवटा ह्या वहिवाटीत तक्रारदार यांचे नांव आहे. चौकशी उता-याच्या झेरॉक्समध्ये काशिनाथ एकनाथ रेडेकर यांचे म्हणजे तक्रारदारांचे पती यांचे नांव आहे. यावरुन वीज मागणी करणारे ग्राहक वीजजोडणी मागितलेल्या जागेचे (premises) वहिवाटदार किंवा भोगवाटदार (occupant) आहेत.त्यामुळे वीजजोडणी देणे वितरण कंपनीस वीज कायदा २००३ प्रमाणे व वीज नियामक आयोगाने मंजुर केलेल्या कृतीमानंके व Supply Code 2005 नुसार देणे जरुरी आहे. मयत मालक कै.राहू धोंडू बंडगर यांच्या वारसांनी हरकत घेतली आहे. त्यांनी योग्य त्या दिवाणी न्यायालयात आपला हक्क शाबीत करुन योग्य ती कारवाई वहिवाटाविरुध्द करावी असे मंचाचे मत झाले आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर **होय** असे देण्यात येते. तक्रारदारास वितरण कंपनीने घरगुती वीजजोडणी द्यावी.

## आदेश

१. तक्रार मंजुर करण्यात येत आहे.

२. वितरण कंपनी, इचलकरंजीच्या अधिका-यांनी तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना घरगुती वीजजोडणी द्यावी व तसा अहवाल मंचास द्यावा.

३. सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष

श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य .. सही/-

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.